## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

कमांक.पुविमं / शाखा क / दिव्यांग /685
पुणे 411005.
दिनांक– 21 / 11 / 2023.

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा / कनि.महाविद्यालये,
जिल्हा–पुणे, अहमदनगर, सोलापूर.

विषय– डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना सोयी सवलती मिळणेबाबत...

संदर्भ–1.शासन पूरकपत्र कमांक : संकीर्ण–2017 / (118 / 17)एस.डी.–6 भाग–1 दि.26 ऑक्टोबर 2023 चे शासनाचे पत्र
2. क.रा.मं. / परीक्षा–5 / 5072 दि.17 / 11 / 2023.

3. कमांक.पुविमं / शाखा क / दिव्यांग / 6134 दिनांकः–16 / 10 / 2023

या संदर्भात सर्व मुख्याध्यापक,प्राचार्य यांना कळविण्यात येते की,मार्च, 2024 मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस आपल्या शाळा / क. महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्याबाबत मंडळाचे निर्धारित प्रपत्रासह त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व कीडा विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण–2017 / (118 / 17)एस. डी.–6 दिनांक 16 ऑक्टोबर 2018 मध्ये नमूद केल्यानुसार सदर विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार शैक्षणिक सवलती देण्यात येतात.

याबाबत संदर्भिय शासन निर्णयात डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रपत्र 22 मध्ये नमूद केलेल्या सवलती व्यतिरिक्त अधिकच्या सोयी सवलती देण्याबाबत शासन स्तरावरून उपरोक्त संदर्भिय शासन शुध्दीपत्रकात नमूद केलेल्या आहेत.

यानुसार आपल्या शाळेतील / विद्यालयातील डायबेटीज (Diabetes mellitus type) आजार असलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यास संदर्भिय शासन निर्णयातील अधिकच्या सोयी सवलतीबाबत अवगत करून त्यानुसार प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करावेत.

सोबतः– कमांक : संकीर्ण–2017 / (118 / 17)एस.डी.–6 भाग–1 दि.26 ऑक्टोबर 2023 शासन पूरकपत्र जोडले आहे. यानुसार विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सवलती देण्याची कार्यवाही करावी. सदरच्या सवलतीपासून विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,पुणे–5

प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीस्तव –
1.विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे–1.
2.शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूरं

८७ Divyang sadar

शासन पूरकपत्र:-

संदर्भ क्र.१० येथील शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र "अ" मधील मुद्दा क्र.२२ -इतर आजारांमुळे शालेय शिक्षणात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत॰ या अंतर्गत मुद्दा क्र.२२.१ ते २२.१७ नुसार तरतुदी करण्यात आल्या आहेत.

२. आता, टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना प्रपत्र "अ" मुद्दा क्र.२२ मध्ये २२.१८ ते २२.२४ अंतर्गत खालील प्रमाणे अधिकच्या सोयी सुविधा अनुज्ञेय असतील.

- **टाईप-१ मधुमेह असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आरोग्यविषयक अतिरिक्त सोयी सुविधा.**

२२.१८ टाईप-१ मधुमेह(Diabetes mellitus type) असणारे विद्यार्थी ज्यांना शाळेच्या सकाळच्या किंवा दुपारच्या सत्रामध्ये खाद्यपदार्थांची (Snaks) आवश्यकता भासल्यास अशा विद्यार्थ्यांना त्यांनी बाळगलेले खाद्यपदार्थ (Snaks) शाळेच्या वर्गखोलीत खाण्याची परवानगी वर्गशिक्षकांनी द्यावी.

२२.१९ मधुमेह असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना डॉक्टरांनी खेळामध्ये भाग घेण्यास परवानगी दिली असेल अशा विद्यार्थ्यांना तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर शालेय खेळामध्ये सहभाग घेण्यासाठी परवानगी द्यावी.

- **टाईप-१ मधुमेह असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्पर्धापरीक्षा आणि शाळेच्या इतर परीक्षेच्यावेळी देय असणाऱ्या अतिरिक्त सोयी सुविधा.**

२२.२०टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना मधुमेहाच्या गोळ्या (Diabetes Tablet) सोबत नेण्याची परवानगी द्यावी.

२२.२१ अशा विद्यार्थ्यांनी सोबत आणलेले औषधे/फळे, खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी, बिस्किटे/शेंगदाणे/सुकामेवा इत्यादी परीक्षेच्या हॉलमध्ये शिक्षकांकडे ठेवण्यात याव्यात, आवश्यक असल्यास या बाबी अशा विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान द्याव्यात.

२२.२२शाळेतील कर्मचाऱ्यांनी टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना ग्लुकोमीटर आणि ग्लुकोज चाचणी पट्ट्या सोबत घेऊन जाण्याची परवानगी द्यावी. ग्लुकोमीटर आणि ग्लुकोज चाचणी पट्ट्या परीक्षेदरम्यान परीक्षा हॉलमध्ये निरीक्षक/शिक्षकांकडे ठेवण्यात येतील.

२२.२३टाईप-१ मधुमेह (Diabetes mellitus type) आजार असलेल्या विद्यार्थ्यांना रक्तातील साखरेची चाचणी करण्याची आणि आवश्यकतेनुसार वर नमूद केलेल्या पदार्थांचे सेवन करण्याची परवानगी द्यावी.

२२.२४CGM (Continuous Glucose Monitoring), FGM (Flash Glucose Monitoring) आणि/ किंवा इन्सुलिन पंप वापरणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान ही उपकरणे ठेवण्याची परवानगी द्यावी. जर Glucose Monitoring साठी स्मार्ट फोन वापरण्यात येत असेल तर तो स्मार्ट फोन शिक्षक/निरीक्षक यांच्याकडे ठेवण्यात यावा.